# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त

नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ४४

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समितीची **विशेष सभा गुरुवार दिनांक २२/०१/२०२६ सायंकाळी ५-०० वाजता स्व. स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री.नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | स्वालिहा मालगावे | उपायुक्त |
| ३. | श्री राजेंद्र माईनकर | सहा. आयुक्त |
| ४. | श्री सागर जकातदार | सहा. आयुक्त |
| ५. | श्री. बाळासाहेब तट्टू | मुख्य लेखाधिकारी |
| ६. | श्री शाहेद शेख | मुख्य लेखापरिक्षक |
| ७. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ८. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ९. | श्री. वर्षा घुगरी | कार्य.अभियंता स्थापत्य विभाग |
| १०. | श्री एन के बागुल | उप अभियंता विद्युत |
| ११. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता बांधकाम विभाग |
| १२. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १३. | श्री. चंद्रकांत मोरे | उप लेखापाल |
| १४. | श्री नरेश अटलाणी | लेखा विभाग |
| १५. | श्रीमती मीना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| १६. | डॉ. संपदा कुलकर्णी | प्र. आरोग्याधिकारी |
| १७. | श्री.लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १८. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १९. | श्री के.डी साबळे | लिपिक आस्थापना |
| २०. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| २१. | श्री हेमंत पावटे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| २२. | श्री. दुष्यंत महाजन | अग्निशमन विभाग |
| २३. | श्री.अरुण चौधरी | मनपा शिक्षण मंडळ |
| २४. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २५. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष विभाग प्रमुख |
| २६. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २७. | श्री बसीत पठान | सिस्टीम मॅनेजर |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

मा.प्रशासक:- आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

# सदर बैठकीत पारीत झालेले ठराव व प्रस्ताव

---

**प्रशासक ठराव क्र.६६६** **दिनांक:-२२/०१/२०२६**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ लेखा/१७६ दिनांक २०/०१/२०२६

विषय क्रमांक:-६८८ म. मुख्य लेखाधिकारी धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडील जा. क्र. धुमपा/लेखा/१७६ दिनांक २०/०१/२०२६ रोजीच्या पत्रानुसार मे. स्थायी समितीपुढे सन २०२५-२६ चे सुधारीत व सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

---

वाचा क्र.०१ व मुख्यलेखाधिकारी यांचा वाचा क्र.०२ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडील जा.क्रं.धुमपा /लेखा/१७६ दि. २०/०१/२०२६ अन्वये मा.आयुक्त सो.यांचेकडून (मा.स्थायी समिती) / मा.प्रशासक यांच्यापुढे सादर होणारे सन २०२५-२६ चे सुधारीत व सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करण्यात आलेले होते.

सन २०२५-२६ चे सुधारीत व सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रकातील जमा व खर्चाच्या प्रत्येकबाबीवर अभ्यास करून तसेच विचार विनियम करून सन २०२५-२६ चे सुधारीत अर्थसंकल्पात डॉग शेल्टर, बाभळे येथे सोलार प्रकल्प व मनपा शाळांचे सोलार व दुरुस्तीसाठी निविदा करीता रु.१ लक्षची टोकन तरतूद करण्यात येत असून व उपरोक्त बाबींसाठी व इतर अनुषंगीकबाबी साठी खालीलप्रमाणे सन २०२६-२७ च्या मुळ अंदाजपत्रकात दुरूस्ती/ सुधारणा करून मे.महासभेपुढे शिफारस करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच खालील नमूद केलेल्याबाबीसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात दर्शविण्यात आलेली तरतूद ही प्राथमिक स्वरूपाची तरतूद असून संबंधित विभागांनी याबाबत डिसेंबर अखेर प्रत्यक्ष होणाऱ्या रक्कमेचे पुर्नविनियोजन अथवा पुरक मागणी करून सुधारीत अंदाजपत्रकात करून घेणे आवश्यक असेल या अटीवर खालील नमूद तरतूदी करण्यात येत आहे.

**जमा बाजू (महसुली व भांडवली)**

| अ.क्र. | लेखाशिर्षक | प्रशासनाने केलेल्या तरतूदी | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ |
|---|---|---|---|---|
| १. | अमृत २.० मलनिस्सारण योजना युआयडीएफ अंतर्गत कर्ज | ० | २५ कोटी | २५ कोटी |
| २. | बखळ जागांचे सुधारीत दरानुसार अपेक्षित उत्पन्न | ० | २ कोटी | २ कोटी |
| ३. | मनपा हद्दीतील नवीन घरांना मालमत्ता कर आकारणीपासून उत्पन्न | ०० | ८ कोटी | ८ कोटी |

**खर्च बाजू (महसुली व भांडवली)**

| अ.क्र. | लेखाशिर्षक | प्रशासनाने केलेल्या तरतूदी | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी() | वाढ |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | अमृत २.० मलनिस्सारण योजना युआयडीएफ अंतर्गत कर्ज | ० | २५ कोटी | २५ कोटी |
| २. | श्वान निवारा केन्द्र (Permanent Dog Shelter) तयार करणे | ० | ३ कोटी | ३ कोटी |
| ३. | लहान मुलांसाठी उद्यान निर्मिती करणे (Children Park) | ० | २ कोटी | २ कोटी |
| ४. | सोलर प्रकल्प | ० | २.५० कोटी | २.५० कोटी |
| ५. | मनपा शाळांना सौर विद्युत सुविधा पुरविणे | ० | १ कोटी | १ कोटी |
| ६. | अतिक्रमण विभाग वाहन खरेदी | ५० लक्ष | १ कोटी | ५० लक्ष |
| ७. | मनपा मालकीच्या जागांवर नावांचे फलक लावणे | ० | ५० लक्ष | ५० लक्ष |
| ८. | फेरीवाला धोरण फलक लावणे | ०० | ५० लक्ष | ५० लक्ष |

उपरोक्त प्रमाणे दुरूस्ती/सुधारणा **केल्यानंतर सन २०२५-२६ चे रक्कम रू.९६९.६१ कोटीचे सुधारीत व सन २०२६-२७ चे रक्कम रू.९४९.२५ कोटीचे मुळ अंदाजपत्रक** मे.महासभेपुढे शिफारस करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने राखीव तरतूदीतील पाच टक्केवाढ करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**